म. ग्रं. सं. ठाणें
विषय का.वा
नौ. वा. क्र. २६०
3480

# रुद्रवीणा



ले.
साहित्याचार्य
बाळशास्त्री हरदास

मङ्गल साहित्य प्रकाशन

हुतात्मा पंडित रामसिंह कुका

रु द्र वी णा : झं का र १

# पं. रामसिंह कुका

ले. साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
नौपाडा शाखा.
१८८३३
अ. क
विभाग
आ. क.

५३६२
IRBK-0105362
IRBK-0105362

दर्पदमन-सामर्थ्याची वृद्धि करणारा जो अग्नि त्याची भक्तजनांनीं वेदीवर संस्थापना केली आहे. त्यास हवि अर्पण करून आम्हींहि त्याला प्रकट व्हावयास लावूं. हे सत्प्रतिपालका अग्निदेवा, पराक्रमाच्या कृत्यांत आमचा तूं प्रसन्न अंतःकरणानें संरक्षणकर्ता हो. —ऋग्वेद

म ङ्ग ल सा हि त्य प्र का श न

"आज्ञांकित शक्ति हें अतर्क्य सामर्थ्य आहे."

—'अज्ञाताचीं वचनें' : प्रस्तावना

अनुयायांच्या सामर्थ्याची बरोबर कल्पना अनुयायांपेक्षां त्यांच्या खऱ्या नेत्यालाच असूं शकते. अनुयायांची पात्रता नि योजना या नेत्यानें ठरवावयाच्या गोष्टी असतात. अंतिम आघाताचें स्थळ नि काळ हीं नेत्यानेंच निश्चित करण्याचीं असतात. इतस्ततः पसरलेल्या पर्वतराजीवर कोठें तरी उभ्या असलेल्या सामान्य माणसापेक्षां उत्तुंग पर्वतशिखरावरून सारा आसमंत दृष्टींत सामावूं शकणाऱ्या अत्युच्च व्यक्तीलाच परिस्थितीचें चित्र अचूक दिसूं शकते. भावनेचा अनावर उद्रेक हा एखाद्या व्यक्तीपुरता तेजस्वी नि विशिष्ट मर्यादेपर्यंत परिणामकारकहि ठरला तरी संघटित सामर्थ्याकडून व्हावयाच्या ध्येयसिद्धीस कित्येकदां तो अडथळा म्हणूनहि आड येतो. दूरदृष्टीनें पाहून निश्चित केलेलें, आपल्या सामर्थ्याची सुस्पष्ट कल्पना घेऊन योजिलेलें, परिणामाची पूर्ण जाणीव असून मग हातीं धरिलेलें असें कार्यच सिद्धीला जाण्याची शक्यता अधिक असते. क्षणिक उतावळेपणा केवढा भयंकर घात करून जातो, याचीं उदाहरणें १८५७ मधील आणि गेल्या अर्धशतकांतील भारतीय क्रांतिप्रयत्नांतहि सांपडूं शकतात. नेत्याच्या शब्दाबरोबर बेभान होऊन शत्रूवर तुटून पडणें, त्याला मारणें हें जसें निष्ठावंत अनुयायाचें कर्तव्य तसेंच नेत्याच्या शब्दासाठीं स्वतः शांतपणें नी समाधानानें मरण पत्करणें— मग तें मानसिक असो वा शारिरिक— हेंहि तितकेंच महत्त्वाचें कर्तव्य आहे. याउलट हौतात्म्याची हौस किंवा अनाठायीं आत्मयज्ञाची उतावळी हीहि संघटनेच्या कार्यसिद्धीला किंवा समाजाच्या उत्कर्षाला उपकारक ठरण्यापेक्षां अपकार करण्याचीच भीति अधिक असते. नियंत्रित, नियोजित नि आज्ञांकित अनुयायी हीच खरी शक्ति.

— संचालक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें
नौपाडा शाखा
अ. क्र ९८८३३
विभाग

# पंडित रामसिंह कुका

## स्वातंत्र्य-समरांतील अतृप्त आशा

१८५७ च्या स्वातंत्र्य-समरांत उभा उत्तरभारत 'बंडा'च्या वणव्यानें धडधडून पेटला आणि दक्षिण भारतांतहि 'बंडा'च्या अनेक ठिणग्या इतस्ततः चमकून गेल्या. त्यावेळच्या त्या प्रलयंकर वैश्वानरांत भारतमातेच्या सुपुत्रांनीं आपल्या शरीराचा एकेक अवयव रक्त, मांस, नसा, वसा—नव्हे शरीरेंच्या शरीरें आहुति म्हणून फेंकून दिलीं; आणि इंग्रजी राज्याचा पुष्ट अजापुत्रहि त्याच वैश्वानरांत बळी म्हणून लोटून देण्याचा पुरेपूर घाट घातला. पण भारतमातेचें दुर्दैव असें कीं, मातृशोणितानें धुळवड साजरी करूं पाहणारे तिचेच कांहीं पुत्र तिच्याविरुद्ध उठले आणि त्यांनीं—इंग्रजांना साहाय्य केलें. या साहाय्याच्या बळावर, कोसळूं पाहाणारी इंग्रजशाही जगली, तगली आणि पुढें फोफावली. जर १८५७ मध्यें पंजाबनें दगलबाजी केली नसती, निदान तो तटस्थ राहिला असता तर क्रांतिकारकांनीं चोहोंकडून पेटवीत आणलेल्या या वैश्वानरांत इंग्रजी राज्य खचित भस्म होऊन पडलें असतें; पण पंजाब तटस्थ राहिला नाहीं; उलट त्यानें स्वदेश-बांधवाविरुद्ध हत्यार उपसळें आणि गुरु गोविंदांच्या, रणवीर रणजितसिंहाच्या उज्ज्वल परंपरेला बट्टा लावीत इंग्रजांच्या खांद्याला खांदा लावून तो लढला. त्यामुळें ५७चा प्रयत्न फसून भारतमाता पारतंत्र्याच्या खातेऱ्यांत पुनश्च फेंकली गेली !

वास्तविक पाहतां पंजाबच्या उज्ज्वल परंपरेला साजेसें हें खास नव्हतें. कारण देवांचें आवाहन करतांना आर्यांच्या होत्यानें पहिला मंत्र म्हटला— नव्हे या जगांतला सरस्वतीच्या वीणेवरचा पहिला महन्मंगल झंकार उमटविला– तो याच पंचनदाच्या पवित्र भूमींत ! या भूमीच्या राजधानीची पहिली शिळा तर मर्यादापुरुषोत्तम प्रभु रामचंद्राचा धाकटा पराक्रमी पुत्र जो लव त्यानें बसविली ! याच भूमींत स्वरक्ताच्या अभिषेकानें तसू तसू भूमि, यज्ञीय वेदीसारखी पवित्र करीत शीखांचे दहा गुरु नि असंख्य वीरवर पतन पावले !– मग १८५७ मधील दगलबाजीचें पाप ही भूमि किती दिवस सहन करणार ? स्वपुत्रांनीं कीर्तीला लावलेला कलंक ती अधोवदन होऊन किती काल मान्य करणार ? झालेल्या मानहानीनें ती भूमि अंतर्बाह्य जणूं तप्त झाली आणि तिच्या त्या प्रदीप्त ज्वालामुखीसमान तेजोगर्भ उदरांतून रथी, अतिरथी, महारथी जन्म घेऊं लागले. स्वातंत्र्यसमरांतील पंचनदाच्या अतृप्त आशा तृप्त करण्यासाठीं हे वीर कटिबद्ध झाले आणि त्यांनीं स्वरक्ताचे लोटच्या लोट वाहवून –५७ सालीं लागलेला कलंक धुऊन काढला ! स्वातंत्र्य-समर ज्या एकोणीसाव्या शतकांत झुंजलें गेलें अगदीं त्याच शतकांत या महान् शुद्धीकरणाला प्रारंभ झाला आणि तेथपासून पंजाबच्या भूमीवर पंजाबी राष्ट्रभक्तांचें रक्त त्या कार्यासाठीं खळखळून वाहात आहे !

सत्तावनच्या स्वातंत्र्य-समरानंतर हिंदुस्थानांतील वैचारिक परंपरेला एक विचित्र वळण मिळालें. शत्रूसमोर दंड थोपटून, त्याच्याशीं दोन हात करून, झुंज लढवून स्वातंत्र्य हिसकावून घ्यावें लागतें याचा लोकांना विसर पडला; आणि अर्ज, विनंत्या, विनवण्या, लोटांगणें या बायकी अस्त्रांनीं राष्ट्र लढूं लागलें. त्यांतच इंग्रजी राज्याच्या शिस्तीनें, डामडौलानें आणि दिमाखानें तत्कालीन

पिढी दिपून गेली आणि आगगाड्या, तारायंत्रें, पोस्ट-ऑफिसें यांच्या थाटांत तिला स्वसंस्कृतीची लाज वाटूं लागली. इंग्रजांचें अनुकरण म्हणजे प्रगति, अशी खूणगांठ मनाशीं बांधून या पिढीनें नाहीं-नाहीं ते ढंग केले. इंग्रजी पोषाख करण्यापासून दारू पिण्यापर्यंत आणि ख्रिस्त्यांच्या धर्तीवर धर्मपंथ स्थापून स्वतःच्या मूर्तिपूजेची नालस्ती करण्यापर्यंत तिनें स्वातंत्र्याचे सारे मार्ग आचरून पाहिले! तिच्यांतील कांहीं अग्रणींनीं हिंदूंच्या धार्मिक समजुतींवर आणि रूढींवर असा कांहीं अविचारी हल्ला चढविला कीं, त्यामुळें समाजाचा आत्मप्रत्ययच नष्ट होऊं लागला. सारांश, अर्ज-विनंत्यांनीं समाजाचें पौरुष लुप्त होत चाललें आणि त्याचा आत्मप्रत्ययहि या हल्ल्यानें संपण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं.

अशा परिस्थितींत, हिंदुस्थानाचें गेलेलें स्वातंत्र्य परत मिळविण्याचा शोध—नक्की शोध ज्यांना लागला आणि तो आपल्या देशबांधवांपुढें मांडण्याचें धाडस ज्यांनीं प्राणाची पर्वा न बाळगतां दाखविलें ते पुरुष धन्य होत! अशा पुरुषांत पंडित रामसिंह कुका हे पंजाबी देशभक्त अग्रगण्य आहेत; त्यांनीं आपल्या इकडील विष्णुशास्त्री चिपळूणकरांप्रमाणें देशबांधवांचा स्वाभिमान सारखा चेतवीत नेला आणि हुतात्मा वासुदेव बळवंत फडक्यांप्रमाणें सरकारशीं दोन हात करून स्वातंत्र्याचा खरा मार्ग चोखाळला. "**रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळेना!**" हा महामंत्र पंजाबच्या भूमिवर प्रथम उद्घोषिणारा पहिला वैतालिक म्हणजे पंडित रामसिंह कुका! या वैतालिकानें हा महामंत्र उद्घोषिला आणि स्वातंत्र्य-समरांत अतृप्त राहिलेल्या पंचनदाच्या आशा पुऱ्या होण्यास प्रारंभ झाला.

## जन्म व प्रारंभींचें जीवन

पंडित रामसिंह कुका यांचा जन्म इ. सन १८२४ सालीं लुधियाना जिल्ह्यांतील भैणी नांवाच्या गांवीं झाला. तरुण वयांत त्यांनीं पंजाब-केसरी महाराजा रणजितसिंह यांच्या सैन्यांत नोकरी केलेली होती. परंतु त्यांचा स्थायी भाव भगवत्भक्ति हा असल्यानें त्यांना ईश्वरसेवेऐवजीं सैनिकाची रजोगुणी प्रवृत्ति आवडेना. एके दिवशीं उबग येऊन त्यांनीं सैन्यांतली नोकरी सोडली व आपलें जन्मस्थान जें भैणी नगर तेथें ते ध्यान, धारणा, भजन, पूजन, जप, जाप्य इत्यादि साधुसंतांच्या मार्गाचें अनुसरण ते करूं लागले. यामुळें पंजाबसारख्या भावनाशील व श्रद्धावान् प्रांतांत त्यांची कीर्ति लवकरच दूरवर पसरून दूरदुरून लोक त्यांच्या दर्शनास येऊं लागले. रामसिंह कुका प्रथम प्रथम सामाजिक व धार्मिक स्वरूपाचा प्रचार करीत असत. मुळांत अंधश्रद्धेवर, लोकभ्रमावर आणि अज्ञानावर आधारलेल्या परंतु पुढें धर्माचें एक अविभाज्य अंग म्हणून रूढ झालेल्या खुळचट परंपरा व सामाजिक अपकृत्यें यांना चवाठ्यावर आणून त्यांच्यावर ते कडक टीका करीत. पण लवकरच त्यांना असा आत्मसाक्षात्कार झाला कीं, " हल्लींच्या पारतंत्र्याच्या अवस्थेंत या स्वरूपाच्या प्रचारानें लाभापेक्षां हानीच अधिक आहे. आधींच पारतंत्र्यामुळें पूर्णपणें आत्मप्रत्ययहीन बनलेल्या लोकांच्या अभिमानस्थान असलेल्या परंपरांवर आपण जर एकामागून एक जोरकस असे निष्ठुर हल्ले चढवीत गेलों तर त्याचा परिणाम समाजांत स्वाभिमानशून्यता, आत्मविस्मृति व परप्रत्ययनेयता वाढण्यांत होऊन गुलामगिरी कित्येक सहस्रकें टिकण्यास त्याची मदत होईल. तेव्हां या वेळीं रूढींवर हल्ला चढवून उपयोग नाहीं. या वेळीं स्वाभिमानाची धार जेवढी

तीक्ष्ण करतां येईल तेवढी तीक्ष्ण करून तिच्या एका घावासरशीं प्रथम पारतंत्र्याचा पाश छिन्न भिन्न करून टाकला पाहिजे ! त्यासाठीं प्रथम शरणागतीपासून तो शिरच्छेदापर्यंत जें जें हत्यार प्रसंगोपात उपयोगी पडेल तें तें शत्रूवर उगारलें पाहिजे. तरच तरणोपाय आहे; अन्यथा नाहीं ! ”

पंडित रामसिंहांच्या मनांत राष्ट्रोद्धाराच्या मार्गाचा हा प्रकाश ज्या वेळीं फांकूं लागला त्या वेळीं त्यांनीं धार्मिक आणि सामाजिक परंपरेवर टीका करण्याचें, स्वाभिमान-भंजनाचें कार्य एकदम थांबविलें व धर्मोपदेशाच्या नांवाखालीं राजकीय स्वातंत्र्याच्या व सामुदायिक सशस्त्र क्रांतीच्या प्रचाराच्या कार्यास जोरानें प्रारंभ केला. असें सांगतात कीं, त्यांच्यामधील या आमूलाग्र परिवर्तनास रामदास नांवाच्या एका महाराष्ट्रीय साधूची संगती कारणीभूत झाली. त्यांनीं विशिष्ट प्रकारची आचारपद्धति लावून देऊन स्वतःच्या नेतृत्वाखालीं पंजाबमध्यें एक नवाच धर्मपंथ प्रवर्तित केला. या संप्रदायाचें नांव नामधारी संप्रदाय असें होतें व रामसिंह हेच त्या संप्रदायाचे गुरु होते.

हा संप्रदाय स्थापन करून कांहीं दिवस मतप्रसार केल्यानंतर प्रत्यक्ष आचार म्हणून रामसिंहांनीं असहयोगाच्या आंदोलनास प्रारंभ केला. लोक जें समजतात कीं, गांधी हेच असहयोगाच्या आंदोलनाचे आद्य प्रवर्तक होत तो एक भ्रम आहे, हें यावरून लक्षांत यावयास हरकत नाहीं. असो, रामसिंह कुकांचा असहयोग गांधींच्या असहयोगापेक्षां किती तरी पटीनें अधिक कडवा होता. यांनीं इंग्रजी शाळा, इंग्रजी न्यायकोर्टें यांवरच नुसता बहिष्कार घातला नाहीं; तर आगगाड्या, तारायंत्रें आणि पोस्ट ऑफिसें यांवरहि बहिष्कार घालून त्यांचा उपयोग करण्याची आपल्या अनुयायांना सक्त मनाई

केली. स्वतःच्या आणि आपल्या आनुयायांच्या प्रवासाची व संदेश-वाहनाची पूर्वकालीन राजाप्रमाणें त्यांनीं अगदीं स्वतंत्र सोय केली होती. त्यांच्या अनुयायांची जसजशी वाढ होत गेली तसतशी या असहयोगाच्या आंदोलनाची तीव्रताहि सरकारच्या ध्यानांत येऊं लागली. या आंदोलनाचा उत्पादक कोण म्हणून सरकारनें गुप्तचरां-करवीं शोध सुरू केला, तों त्याला पंडित रामचंद्र कुका यांचें नांव प्रथम कळलें. सरकारनें लगेच कुका यांच्या नामधारी संप्रदाया-वर निरनिराळीं गुप्त बंधनें लादून त्यांचा संप्रदाय नामशेष कर-ण्याचा प्रयत्न चालविला. पण एका कवीनें म्हटलेंच आहे ना, " केला जरी पोत बळेंचि खालें । ज्वाला तरी ते वरती उफाळे" ॥ सरकारशीं-संघर्षाचा प्रसंग येऊं लागतांच रामसिंहांचा उत्साह उफाळून उठला.

## कुका संप्रदायांचें गुप्त संघटन

ज्यावेळीं स्वातंत्र्योन्मुख लोकांवर राज्यसत्तेचीं प्रबल बंधनें बसून त्यांना त्यांच्या सर्वसामान्य हालचालीहि बंद करणें भाग पडतें व संघ-रीत्या आपलें गाऱ्हाणें चवाठ्यावर मांडण्याचीहि त्यांस बंदी होते त्या वेळीं स्वाभाविकपणेंच गुप्त संस्था स्थापन करून कार्य करण्या-कडे जनतेच्या पुढाऱ्यांची प्रवृत्ति होते. वास्तविक प्रजाजनांना त्यांचीं गाऱ्हाणीं प्रगटपणें मांडूं देण्यांत राज्यसत्तेला धोका नाहीं; पण त्यांची गळचेपी करण्यांत, त्यांच्या सर्व वाटा बळजबरीनें बंद करण्यांत मात्र आहे. कारण त्यामुळें द्वेषभाव वाढून मूळचे अत्यंत शांतताप्रिय असलेले प्रजाजन देखील त्यांच्या स्वभावाविरुद्ध असलेल्या अत्याचारी मार्गाचें अवलंबन करण्यास प्रवृत्त होतात. हिंदुस्थान-सारखा शांतताप्रिय देश पृथ्वीच्या पाठीवर कोणता तरी असेल काय ? पण मुळांत " कोई नृप बने हमे क्या हानी ? " अशा वृत्तीच्या लोकांमधूनच उत्पन्न झालेल्या पंडित रामसिंह कुका

यांच्यासारख्या तपस्वी व्यक्तीला देखील गुप्त संस्था काढून, जी गोष्ट सरकार एरवीं ऐकावयास तयार नाहीं ती हत्यारांच्या खणखणाटानें ऐकवावी अशी स्फूर्ति उत्पन्न झाली याचें कारण तरी हेंच होय ! रामसिंह कुका यांनीं त्यांच्या संप्रदायावर सरकारी बंधनें लादण्यांत आल्यानंतर गुप्त रूपानें कार्य करावयास प्रारंभ केला. त्यांनीं पंजाब प्रांत २२ जिल्ह्यांत विभाजित करून त्या प्रत्येक जिल्ह्यांत त्याच्या नामधारी संप्रदायाची एकेक शाखा काढली व त्या प्रत्येक शाखेवर एकेक प्रमुख नेमून २२ जिल्ह्यांचे २२ प्रमुख नियुक्त केले. या बावीसहि प्रमुखांनीं पंडित रामसिंह कुका यांच्यापासूनच नामधारी संप्रदायाची दीक्षा घेतलेली असून ज्याप्रमाणें गुरूकडून त्यांना संघटन वाढविण्याचा आदेश देण्यांत आला होता त्याचप्रमाणें इतरांना संप्रदायाची दीक्षा देण्याचा अधिकारहि देण्यांत आला होता. या संप्रदायाच्या शपथविधीमध्यें हिंदूंच्या नैतिक सिद्धान्तांना अतिशय मानाचें स्थान असे. गोरक्षणाचें या संप्रदायांत अतिशय महत्त्व असून प्रत्येक सांप्रदायिकाला "मी प्राणपणानें गाईच्या जीविताचें संरक्षण करीन" अशी शपथ घ्यावी लागे. संप्रदायाचें काम विजेच्या गतीनें वाढत होतें. परंतु रामसिंहांची रहस्य राखण्याची पद्धति इतकी विलक्षण होती कीं, नामधारी संप्रदाय जवळ जवळ अर्धमेला होऊन पूर्णपणें निरुपद्रवी झाला अशी सरकारची लवकरच खात्री पटली, व म्हणून १८६९ मध्यें सरकारनें संप्रदायावर लादलेलीं सारीं बंधनें काढून घेतलीं !

बंधनें दूर होतांच नामधारी लोकांना असें वाटलें कीं, आपल्या सामर्थ्यानें आणि गुरूच्या आध्यात्मिक प्रभावानें भिऊनच सरकारनें हीं बंधनें काढून घेतलीं आहेत, म्हणून त्यांचा उत्साह परमावधीला पोहोंचला व त्यामुळें गुरूच्या आज्ञेवांचून कांहीं एक

करावयाचें नाहीं या शिस्तीऐवजीं आपण काय वाटेल तें केलें तरी तें सांभाळून नेण्याचें सामर्थ्य आपल्या गुरूमध्यें आहे असा भोळा भाव बाणून त्याच्या अतिरेकानें ते लवकरच कांहींसे उन्मत्त बनले. लवकरच त्या उन्मतपणाचीं प्रत्यंतरें ठिकठिकाणीं येऊं लागलीं. पैशाचिक नसून दिव्य असला तरी तो एक प्रकारचा उन्मादच होता ! त्यामुळें सारासार विवेकशक्ति त्यामध्यें कोठून असणार ?

इ. स. १८७१ सालीं कांहीं कुके वीर अमृतसर येथें जात होते. वाटेंत अमृतसरच्या जवळपास गाईचा एक जथा घेऊन कसाईखान्याकडे जात असलेल्या कांहीं कसायांशीं त्यांची गांठ पडली. लगेच आपलीं खड्गें निष्कोषित करून त्यांनीं त्या कसायांच्या जथ्यावर चाल केली व त्या सर्वांचा वध केला. नंतर अमृतसर येथें न जातां ती सर्व मंडळी भैणी येथें श्रीरामसिंहांच्या निवासस्थानीं आश्रयार्थ आली. कसायांच्या वधाची गोष्ट थोडयाच वेळांत सर्वतोमुखीं झाली व सरकारनें संशयावरून अमृतसर येथील कांहीं प्रतिष्ठित हिंदूंना अटक करून तुरुंगांत त्यांचा छळ सुरू केला. रामसिंहांना ही गोष्ट कळतांच नामधारी संप्रदायाचें चारित्र्यबल व निर्भीकता किती वरच्या दर्जाची आहे हें साऱ्या पंजाबच्या डोळ्यांत भरविण्यास ही संधि अतिशय मोलाची आहे हें ओळखून त्यांनीं आपल्या अनुयायांस सांगितलें कीं, "निरपराधी नागरिकांचा असा छळ होऊं देण्यांत पौरुष नाहींच नाहीं, पण माणुसकीहि नाहीं. तुम्हीं कोर्टांत जाऊन जें तुमच्या हातून घडलें आहे त्याचा स्वीकार करा व त्याबद्दल जी शिक्षा होईल ती भोगून आपल्या चारित्र्याचा जनता आणि सरकार अशा दोघांनाहि परिचय करून द्या. गाय हें हिंदु धर्माचें दैवत आहे. ती सर्व मानवजातीची माता आहे. तिच्या हत्याऱ्यांचा तुम्ही वध करण्यांत कांहीं एक पाप केलें नाहीं.

जें तुम्हीं केलें आहे त्याबद्दल इंग्रज सरकार तुम्हांला कितीहि शिक्षा देवो. परंतु इंग्रजी न्यायकोर्टापेक्षां अनंतपटीनें श्रेष्ठ असलेल्या परमेश्वरी न्यायमंदिरांत तुम्ही मानाचे मंदीलच पटकावणार आहांत यांत संशय नाहीं!" आपल्या गुरूचा हा आदेश ऐकून ती मंडळी आपण होऊन सरकारच्या स्वाधीन झाली व मिळाल्या त्या शिक्षा पत्करून सारा पंजाब प्रांत आपल्या चारित्र्यबलानें हलवून, आलेल्या आपत्तीस तोंड द्यावयास तयार झाली. कोर्टांत त्यांनीं असें सांगितलें कीं, "केवळ आमच्या गुरूच्या आज्ञेवरून आम्ही तुमच्या स्वाधीन होत आहों; एरवीं तुम्हीं काय वाटेल तें केलें असतें तरी आमचें नखाग्र देखील तुमच्या दृष्टीस पडलें नसतें." हें ऐकतांच रामसिंहांचा व्यक्तिप्रभाव सरकारच्या डोळ्यावर आला व ब्रिटिशांची हिंदुस्थानांत दृढमूल झालेली सत्ता हिंदुस्थानांतून उखडून फेंकून देण्याचीं स्वप्नें पाहात असलेल्या या भयानक व्यक्तीचें नैतिकदृष्ट्या इतकें जबरदस्त वजन असणें चांगलें नाहीं असें वाटून सचेत झालेलें ब्रिटिश सरकार रामसिंहांना जाळ्यांत अडकविण्याच्या प्रयत्नास लागलें.

## अकालींच विप्लवाची घोषणा

वास्तविक पंडित रामसिंहांचा विचार असा होता कीं, नामधारी संप्रदायाचें संघटन पूर्ण झाल्याखेरीज आणि मनाची खात्री होण्याइतकी धनसंपत्ति व शस्त्रसंपत्ति एकत्रित झाल्याखेरीज प्रगट अशा कोणत्याच कार्याला हात घालावयाचा नाहीं. आपली संघटना व्यवस्थित झाल्यानंतर प्रथम सैन्यांत विद्रोह उत्पन्न करावयाचा, बंडाचा पहिला बावटा सैन्यानें उभारावयाचा व नंतर आपण त्यांत उडी घ्यावयाची, असें त्यांचें मुळांत आंखलेलें धोरण होतें. क्रांतीचा असा नियम आहे कीं, सामान्य लोक विरुद्ध असले तर ज्याप्रमाणें नुसत्या सैन्याच्या भरंवशावर क्रांती यशस्वी होत

नाहीं त्याप्रमाणें सैन्य जर अनुकूल नसेल तर निव्वळ सामान्य लोकांच्या भरंवशावरहि क्रांती यशस्वी होत नसून उलट तिचें दमन करणें अधिकच सोपें जातें. किंबहुना नुसत्या सैन्याची उठावणी जें करूं शकते तें निव्वळ सामान्य लोकांची उठावणी कधींच करूं शकत नाहीं. गुरु रामसिंहांना या गोष्टीची पूर्ण जाणीव होती म्हणून प्रत्यक्ष कार्यक्षेत्रांत ते उडी घेत नव्हते. पण या संघटनेला लाभलेलं १८७२ साल तिच्या मुळावरच आलें असें म्हटलें पाहिजे. या सालीं अशी एक घटना घडून आली कीं, जीमुळें रामसिंहांचे बेत जागच्या जागींच जिरून एक यशस्वी क्रांती म्हणून ज्या प्रकरणाचा नामनिर्देश करतां आला असता, त्याचा निर्देश आज विप्लवाचें एक दिव्य उत्थान म्हणून दुर्दैवानें करावा लागत आहे ! ती घटना पुढीलप्रमाणें—

दिनांक १३ जानेवारी १८७२ या दिवशीं कांहीं कुके वीर माघ महिन्यांत भरणाऱ्या एका यात्रेंत सम्मीलित होण्याकरितां जात होते. त्यांतील एकजण रस्त्यांतच लागणाऱ्या एका संस्थानांत कांहीं कामाकरितां थांबला. रस्त्यांत त्याचें एका मुसलमानाशीं भांडण झालें. अनेक मुसलमानांनीं एकत्र जमून प्रथम त्याला खूप खरपूस चोप दिला. व नंतर त्याच्या भावनांवर तेजाबच शिंपडावें म्हणून एका गाईला त्याच्या समोर खालीं पाडून तिचे हाल हाल करून हलाल केलें. त्यांच्या हातून सुटका झाल्यानंतर तो गृहस्थ भैणी येथें गुरु रामसिंहांच्या निवासस्थानीं आला व नामधाऱ्यांच्या एका गुप्त सभेंत त्यानें रडत रडत ही क्षोभकारक घटना ऐकविली. गुरूनें त्यांच्या ठिकाणीं गोमातेविषयीं इतकी जबरदस्त भावनामय निष्ठा उत्पन्न केली होती कीं, ही हकिकत ऐकतांच काळजावर निखाऱ्यांचा वर्षाव केल्यासारखा परिणाम होऊन सर्व कुके वीर अतिशय संतप्त

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. ५३६२

झाले. त्यांनीं गुरु रामसिंहांना अवश्य तितका नम्रपणा धारण करून पण निश्चितपणें अशी विनंति केली कीं, “ मनुष्याच्या सहनशक्तीलाहि कांहीं मर्यादा असते. आज ती मर्यादा तुटलेली आहे. आजपर्यंत ज्या विप्लवाची तयारी करण्यासाठीं म्हणून आपण इतके दिवस घालवून, इतकी साधनसंपत्ति व माणसें एकत्रित केलीं त्या विप्लवाच्या प्रारंभाचा दिवस निश्चितपणें आला आहे, असें आम्हांस वाटतें. आजच्या आज विप्लवाची घोषणा आपण केली पाहिजे. ” गुरु रामसिंहांनीं त्यांचें म्हणणें शांतपणें ऐकून घेतलें. त्यांना हें निश्चितपणें माहीत होतें कीं, आपली जितकी तयारी झाली आहे तिचा उपयोग एकादें देशी राज्य उलथून पाडण्याइतपत होऊं शकेल, परंतु दृढमूल इंग्रजी सत्ता उलथून पाडण्याच्या दृष्टीनें तिचा फारसा उपयोग नाहीं. त्यांनीं पुष्कळ समजावणीच्या स्वरांत व अजीजीनें संतप्त नामधाऱ्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. त्यांनीं त्यांना सांगितलें कीं, “ अन्यायी कृत्यांचा संताप येणें ही स्वाभाविक गोष्ट आहे. परंतु प्रतिशोधाची तयारी पूर्ण झाल्याखेरीज अन्यायाचा सूड घेण्याची भाषा बोलणें अगर कृति करणें म्हणजे आत्मनाश ओढवून घेऊन एकाहून एक भयानक अन्यायांची परंपरा स्वतःवर कोसळवून घेणें आहे. प्रतिशोध घ्यावयाचा तर पूर्णपणें अन्यायाचें परिमार्जन करण्याइतकी ताकद अंगीं आल्यावरच तो घेण्याची उठावणी करण्यांत कांहीं तात्पर्य आहे. दैत्यांनीं देवांवर अन्याय केला; पण भगवान् विष्णूच्या संदेशानुरूप समुद्रमंथनांतून निघालेलें अमृत पिऊन अमर होईपर्यंत देवांनीं तो मुकाटपणें सहनच केला होता. देव जर त्याच्या आधीं उठते तर ते मार खाऊन फजीत होते ! सिद्धता झाल्यावर मात्र देवांनीं दैत्यांचें असें कंबरडें मोडलें कीं, दैत्यांना पुनः म्हणून तोंड वर काढावयाची छाती झाली नाहीं.

द्रौपदीच्या वस्त्रहरणाच्या वेळींच शत्रुसैन्यावर तुटून पडण्यासाठीं अधीर होऊन भीमसेन गदा घेऊन भरसभेंतच उभे ठाकले होते; परंतु वरून भोळा सांब दिसणारा धर्म स्वतःचें सामर्थ्य ओळखून होता. त्याला हें माहीत होतें कीं, दुर्योधनाला मारणें सोपें असलें तरी स्वतःच्या छातीचा कोट करून त्याचें संरक्षण करावयास सन्निध असलेल्या भीष्म, द्रोण, कर्णा-सारख्या सर्वास्त्रज्ञांसमोर आपला निभाव लागणार नाहीं. त्यानें मुकाटपणें तयारीच्या अंतस्थ हेतूनें बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास स्वीकारला. त्यानंतर सर्वास्त्रवेत्ता झालेल्या अर्जुनाच्या भंरवशावर त्यानें कौरवांचा असा प्रतिशोध घेतला कीं, खास दुर्योधनाच्या वंशांत त्याला तिलांजली द्यावयास देखील एकहि संतान उरलें नाहीं. नामधारी संप्रदाय इतका सिद्ध नाहीं कीं, जो आज इंग्रजांच्या दृढमूल सत्तेशीं टक्कर देऊं शकेल. आणखी थोडे दिवस थांबा; पूर्ण तयारी होऊं द्या; माझ्यावर विश्वास ठेवा. लवकरच एक असा दिव्य दिवस उगवेल कीं, ज्या दिवशीं आपण वर्तमानकालीनच काय, परंतु अतीत आणि अनागत अशा सर्वप्रकारच्या अन्यायांचा कायमचा प्रतिशोध—सूड घेऊन टाकूं!" गुरूनें इतकें समजावून सांगितल्यानंतर बहुतेक नामधारी शांत झाले व त्यांनीं गुरूच्या आज्ञेंत राहण्याचें कबूल केलें.

परंतु त्यांपैकीं दीडशें व्यक्ती मात्र प्रतिशोधाच्या आगींत पेटून उठल्या. त्यांनीं गुरूच्या आज्ञेचा भंग केला व प्रगट विद्रोहाची घोषणा करून गुरु "नको नको" म्हणत असतांनाच तेथून प्रयाण केलें. आतां मात्र पंडित रामसिंहांच्या समोर एक चमत्कारिक पेंचप्रसंग निर्माण झाला. एक तर त्यांना या निष्फळ विद्रोहांत समाविष्ट होणें भाग आलें किंवा दुसरें म्हणजे निदान बहुसंख्य नामधाऱ्यांना वांचविण्यासाठीं म्हणून ह्या अतिरेकी नामधाऱ्यांचा व

आपला कांहीं संबंध नाहीं असें प्रगटपणें घोषित करणें नशिबीं आलें. त्यांना सरकारकडून विचारणा करण्यांत आली असतां रामसिंहांनीं अशी घोषणा केली कीं, "या विद्रोही नामधाऱ्यांचा-माझा कांहीं संबंध नाहीं. ते संप्रदायांतून बाहेर निघून गेलेले आहेत." रामसिंहांनीं केलें हें बरें कीं वाईट याचा निर्णय करणें अत्यंत कठीण आहे. त्यामुळें त्याचा निर्णय करण्याची जबाबदारी आम्ही आमच्या स्वतःवर न घेतां ती आम्ही वाचकांवरच सोंपवितों. मात्र रामसिंहांनीं केलें त्यांत स्वार्थाचा वा भित्रेपणाचा तृणमात्रहि लेश नव्हता ! उलट त्यांनीं जें केलें तें कांहीं एका विशिष्ट ध्येयनिष्ठ धोरणानेंच केलें याविषयीं या संप्रदायांतील, गुर्वाज्ञेला न जुमानतां बंड करून उठलेल्या दीडशें लोकांचीहि खात्री होती. पुढें असें दिसून आलें कीं, या दीडशेंपैकीं प्रत्येकजण मरतांना राम-सिंहांच्या जयघोषाच्या गर्जनेंतच आपला देह धारातीर्थी ठेविता झाला ! त्यांतील एकाचीहि रामसिंहांविषयींची निष्ठा व भक्ति त्यांनीं संबंध नाकारल्यावरहि अणुमात्र ढळली नाहीं. असो.

## कुका वीरांचें आत्मबलिदान

भैणी येथील रामसिंहांच्या निवासस्थानांतून उपर्युक्त दीडशें विद्रोही संतप्त होऊन निघाले आणि त्यांनीं शेजारच्या मलौध नांवाच्या किल्ल्यावर अचानकपणें आक्रमण करून तेथील अधि-कारीवर्गाला विद्रोहांत सामील होण्यास सांगितलें. वास्तविक येथील अधिकारीवर्गानें पंडित रामसिंहांना विद्रोहांत सामील होण्याचें वचन दिलें होतें. परंतु अपरिपक्व स्थितींत, रामसिंहांच्या आज्ञेविरुद्ध आलेला व त्यांच्या समर्थ नेतृत्वाशीं वंचित असलेला हा विद्रोह पाहून किल्ल्यावरील अधिकारीवर्गानें त्यांत सामील होण्याचें साफ नाकारलें व रामसिंहांप्रमाणेंच सुयोग्य संधीची वाट पाहात आपली

तयारी पूर्ण करण्याचा त्यांना उपदेशच केला. परंतु ते उपदेश ऐकण्याच्या मनःस्थितींत नव्हते. त्यांना उपदेशच ऐकावयाचा असता तर तो ते रामसिंहांचाच कां न ऐकते ? त्यासाठीं इतक्या आडवळणाची गरजच काय होती ? अधिकारीवर्ग आपल्या विद्रोहांत सामील व्हावयास तयार नाहीं व किल्ल्यावरील शस्त्रसंपत्ती आपल्या स्वाधीन करावयासहि तयार नाहीं असें पाहून संतप्त झालेल्या त्या लोकांनीं त्यांची सरसहा कत्तल उडवून किल्ल्यावरील एक तोफ, तरवारी व घोडपागा यांच्यावर ताबा मिळविला.

त्यानंतर एक दिवस विश्रांति घेऊन दुसऱ्या दिवशीं मालेरकोटला संस्थानावर त्यांनीं स्वारी केली. राजधानी जिंकून राजमहालांतील दिवाणखान्यावर व खजिन्यावर त्यांनीं चाल केली. मलौधची बातमी मालेरकोटला येथें पूर्वींच येऊन पोहोंचली असल्यामुळें तेथील लोक आधींच सुसज्ज होते. भयंकर हाणामारीचें युद्ध होऊन उभय पक्षांतील कांहीं मंडळी रणांत पतन पावल्यानंतर लुधियाना जिल्ह्याचे डेप्युटी कमिशनर मि. कावन यांना ही बातमी लागली. सुसज्ज गोऱ्या फौजेसह ते थोड्याच वेळांत त्या ठिकाणीं येऊन दाखल झाले. थोडा वेळ युद्ध झाल्यानंतर क्रांतिकारकांना माघार घेणें भाग पडून निकटवर्ती घनदाट जंगलांतून मार्ग काढीत पतियाळा संस्थानाच्या रोखानें ते पसार झाले. मि. कावन हेहि आपल्या अगणित फौजेनिशीं दक्षतेनें त्यांचा पाठलाग करूं लागले. अखेरीस पतियाळा संस्थानाच्या सीमारेषेवर असलेल्या ‘ रठ ’ नांवाच्या गांवाजवळील घनदाट जंगलांत हातघाईचें प्राणांतिक युद्ध होऊन ६८ क्रांतिकारक पाडाव झाले व मि. कावन यांच्या हातीं लागले. दुसऱ्या दिवशीं त्यांना मालेरकोट नगरांत आणण्यांत आलें. मि. कावन यांनीं त्यांच्यावर बंडखोरीचा आरोप ठेवून त्यांपैकीं पन्नास

जणांना निवडून बाहेर काढलें व एक तोफ सुसज्जित करून लोकांना धाक बसण्यासाठीं म्हणून, भर उघड्या मैदानांत टोळ्या-टोळ्यांनीं त्यांना तोफांच्या तोंडीं दिलें. दहा–दहा, पांच–पांचच्या टोळ्या करून त्यांना तोफांच्या तोंडांशीं बांधीत. मुखानें, " वीर गुरु रामसिंह कुका यांचा जयजयकार असो " म्हणून गर्जना करीत तोफेच्या एकाच धडक्यासरशीं शरीराचे तुकडे तुकडे होऊन ते अंतराळांत भिरकावले जात. तोफेच्या तोंडीं बांधले जात असतां-नाच ते काय ते लोकांच्या दृष्टीला दिसत परंतु एकदां तोफ डागली गेल्यानंतर मात्र कोणाचाहि चेहरा लोकांना दिसत नसे ! प्रथम आवाज, नंतर धूर व त्यानंतर अंतराळांतून खालीं येणारें कोणाचें डोकें, कोणाची कवटी, कोणाचा हात, कोणाचा पाय व इतस्ततः विखुरलेले रक्तलांछित मांसखंड इतकेंच काय तें अश्रूंनीं डोळे डंव-रलेल्या स्थितींत लोकांना बघावयास सांपडे !

याप्रमाणें एकोणपन्नास व्यक्ति तोफांच्या तोंडीं देण्यांत आल्यानंतर फक्त एक व्यक्ति काय ती शिल्लक होती. तें एक तेरा वर्षांचें बालक होतें ! त्याला तोफेच्या तोंडीं बांधण्यांत येत असतांना डे. कमिशनर मि. कावन ह्यांची पत्नी हा सारा प्रकार तेथें उघड्या डोळ्यांनीं पाहात होती. केळीच्या गाभ्यासारख्या दिसणाऱ्या, यौवना-च्या उबरवंठ्यावर अजून प्रवेशहि न केलेल्या त्या कोमल किशोराला तोफेच्या तोंडीं करकचून आवळण्यांत येत असलेलें पाहून तिच्या अंतःकरणाला पाझर फुटला. ती एक इंग्रज स्त्री होती ! तिच्याच देशबांधवांच्या अन्यायी वृत्तीमुळें इंग्रज आणि हिंदुस्थानचे हिंदु यांच्यामध्ये पिढ्यानुपिढ्या वैर उत्पन्न झालें याची तिला पूर्ण जाणीव होती, आणि ती इंग्रज असल्यामुळें शत्रु लहान असला तरी त्याला जिवंत सोडतां कामा नये या साध्या प्रमेयाची तिला कोणी

मुद्दाम ओळख करून देण्याचें कारण नव्हतें. तरीहि पण ती एक स्त्री होती. दया, अनुकंपा, सहसंवेदना या स्त्रीत्वाच्या साऱ्या विशेषांसहच तिचा जन्म झाला होता. कावन यांची निर्घृण निष्ठुरता तिच्या ठिकाणीं कशी यावी ? तिच्या नेत्रांतून अविरत अश्रूंचा पूर सुरू झाला व तिनें कावन यांची त्या मुलाला सोडून देण्याविषयीं प्रार्थना केली. स्त्रीचे अश्रू ज्याच्या हृदयावर प्रभाव करूं शकणार नाहींत असा पुरुष कोणी असूं शकेल काय ? कावन यांचें अंतःकरण विरघळलें; त्यांनीं लगेच त्या मुलाला सोडविलें, पण त्यांना हें माहीत नव्हतें कीं, त्या मुलाचें वय जरी कोंवळें असलें, तनूची कोमलता जरी केळीच्या गाभ्यासारखी कोमल असली तरी त्या देहयष्टीच्या पापुद्र्याच्या आंत क्रांतिगर्भ भावनांचे लालभडक निखारे नुसते फुलून निघाले होते ! कावन यांनीं कौतुक म्हणून त्या मुलाला सहज जवळ बोलाविलें व त्याचे प्राणधन असलेले गुरु रामसिंह यांना ठेवणींतली एक इरसाल शिवी हांसडून ते म्हणाले, “ जर तूं त्या बदमाष रामसिंहाचें अनुयायीपण सोडून देण्यास तयार असशील तर तुला आम्ही दोषमुक्त करून सोडून देऊं !” गुरूला हांसडलेली शिवी ऐकतांच त्या मुलाचे डोळे खदिरांगारासारखे लाल होऊन त्यांतून ठिणग्या बाहेर पडल्या. रामसिंहांचा जयघोष करीत मि. कावन यांच्या अंगावर त्यानें झेंप घेतली व विलायती हवेंत मनमोकळेपणानें वाढलेली त्यांची बादशाही दाढी इतक्या जोरानें तो ओढूं लागला कीं, केस मुळापासून उपटले जाऊन वेदनेनें कावन यांचे डोळे पांढरे होण्याची पाळी आली. जवळ असलेल्या सैनिकांनीं त्या मुलाच्या अंगावर चाल केली. ते त्याच्या अंगांत संगिनी भोसकूं लागले. तरी त्याचे हात कावन यांच्या दाढीवरून सुटेनात ! शेवटीं तरवारीच्या जबरदस्त फटकाऱ्यानें त्या मुलाचे दोन्ही हात

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे



तोडून टाकल्यानंतरच काय ती; कावन यांची त्याच्या जबरदस्त मिठींतून सुटका झाली. संतप्त झालेल्या सैनिकांनी कावन यांच्या समोरच त्या मुलाचे राईराईएवढे तुकडे करून ते अंतराळांत भिरकावून दिले!

## कुका आंदोलनाची समाप्ति

डेप्युटी कमिशनर मि. कावन यांनीं पन्नास व्यक्तींची याप्रमाणें वासलात लावल्यानंतर उर्वरित अठरा व्यक्तींना दुसऱ्या दिवशीं मलौधच्या किल्ल्यावर नेलें व तटावर फांसावर लटकाविलें. त्यांचे पन्नास बांधव ज्या आनंदानें तोफेच्या तोंडीं गेले त्याच आनंदानें व उत्साहानें गुरूच्या नांवाची गर्जना करीत ही सर्व मंडळी फांसावर लटकली. गुरु रामसिंहांनीं जरी या नामधाऱ्यांचा व आपला कांहीं संबंध नाहीं असें म्हटलें असलें तरी त्याचा अर्थ इंग्रज सरकारहि समजून होतें. मालेरकोटला येथील पूर्वोक्त युद्धांत कुका वीरांचा अद्भुत पराक्रम, अपूर्व साहस व उज्ज्वल ध्येयवाद पाहून सरकार त्यांच्या बाबतींत चांगलेंच जागें झालें होतें. त्यानें ओळखलें कीं, जोंवर गुरु रामसिंह व त्याचा नामधारी संप्रदाय पंजाबांत शिल्लक आहे, तोंवर याहूनहि अधिक भयानक प्रसंग उद्भवल्याखेरीज राहणार नाहींत. त्यानें नामधारी संप्रदायावर सरसहा दमनाचा वरवंटा फिरवून गुरु रामसिंह यांना इ. सन १८१८ च्या रेग्युलेशन नंबर ३ च्या अन्वयें पकडून ब्रह्मदेशांत निर्वासित केलें व तेथें १८८९ सालीं स्वातंत्र्य-योगाच्या या महान् उपासकाचा देहान्त झाला. आद्य क्रांतिकारक म्हणून वासुदेव बळवंत फडके यांच्या नंतर पंडित रामसिंह कुका यांच्याच नांवाचें महत्त्व आहे. महाराष्ट्रांत जें वासुदेव बळवंतांचें महत्त्व तेंच पंचनदांच्या पवित्र परिसरांत रामसिंह कुका यांचें होय.

# क्रांतिकारकांचीं चरित्रें

- पं० रामसिंह कुका
- रासबिहारी बसू
- गोविंद पिंगळे
- नलिनी वाक्ची
- सरदार बन्तासिंह
- यतींद्रनाथ मुखोपाध्याय
- पं० गेंदालाल दीक्षित
- किशनसिंह गडगज्ज
- लाला हरदयाळ

क्रां ति का र कां च्या क था
प्रकाशन ४४ वें : आवृत्ति पहिली
पृ ष्ठ सं ख्या १७ : मू ल्य ४ आ णे
देवदीपावलि १८६९ : १३ डिसेंबर-४७

★

५३६२
बा.वा.

IRBK-0105362

म ङ्ग ल सा हि त्य प्र का श न
संचालक : अमरेन्द्र गाडगीळ
अनुशासक : १ दि. वि. काळे, एम्. ए.
२ रा. त्र्यं. रानडे
प्रकाशिका :
सौ. मङ्गला अमरेन्द्र गाडगीळ
मङ्गल साहित्य प्रकाशनाकरितां
आनंदचेम्बर्स, आम्बराई, पुणें ४.
मुद्रक :
अ म रे न्द्र ल क्ष्म ण गा ड गी ळ
अ ग्र णी मु द्र णा ल य
आनन्दचेम्बर्स, आम्बराई, पुणें ४.